# प्रकरण सहावे

## प्रकरण सहावे

# समारोप

श्याम कुरळे यांच्या 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'लास्ट आयटेम' व 'अपूर्ण कथेचा शेवट' या सात कथासंग्रहांच्या आधारे त्यांच्या कथालेखनाचा अभ्यास या लघुप्रबंधात केला आहे.

साठोत्तरीनंतरची विकसित नवकथा व त्यानंतरच्या कथेत येणारे नवनवे आविष्कार स्वीकारलेली कथा या जडणघडणीतील श्याम कुरळे यांची कथा महत्त्वाची वाटते. त्यांच्या कथा मराठी कथेच्या परंपरेला छेदत नवीन धाटणी निर्माण करताना दिसतात. ते आपल्या कथांमधून ग्रामीण जीवन व नागर जीवनातील मध्यमवर्गीय जीवन, मानवी व्यथा वेदना, राजकीय ताणतणाव, जगण्यातील एकटेपण, वृद्धांच्या व्यथा यातना यांचे समग्र दर्शन आपल्या कथांमधून घडवितात. पात्रांच्या मनातील असंख्य पापुद्रयाचे कंगोरे, आंदोलने ते कथेत तन्मयतेने मांडताना दिसतात.

ग्रामीण व नागर जीवनातील बदलत्या सामाजिक संदर्भातील आशय, जाणिवा त्यांच्या कथांमधून उत्कटपणे प्रकट झालेल्या दिसतात.

प्रस्तुत प्रकरणामध्ये 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'लास्ट आयटेम' व 'अपूर्ण कथेचा शेवट' या सात कथासंग्रहातील कथालेखनाचा परामर्श घेतला आहे.

श्याम कुरळे यांचा व्यक्तिपरिचय व साहित्य परिचयाचा आढावा पहिल्या प्रकरणात घेतला आहे. त्यामध्ये व्यक्तिपरिचय, त्यांचे बालपण, शिक्षण, संस्कार, अध्यापन व्यवसाय, लेखनाविषयीची आवड, सुरूवातीचे लेखन, नंतर होत गेलेला विकास, समग्र साहित्याचे स्वरूप, त्यांना लाभलेले पुरस्कार यांचा थोडक्यात आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

श्याम कुरळे यांच्या जन्मापासून त्यांच्या शिक्षणाआड आलेली त्यांच्या घरची गरीबी व त्यावर मात करत पूर्ण केलेले शिक्षण, त्या दरम्यान भेटलेल्या अनेक व्यक्तिंनी त्यांना केलेले सहकार्य व त्यातूनच त्यांची घडत गेलेली जडणघडण याचा या प्रकरणात आढावा घेतला आहे. शालेय शिक्षण पूर्ण करत असताना त्यांना वाचनाची प्रचंड आवड होती. त्या आवडीतून सानेगुरूजींच्या साहित्याचा प्रभाव त्यांच्या जीवनावर झाल्याचे दिसते. शालेय जीवनापासूनच लेखनाची झालेली सुरूवात व स्नेहलता दसनूरकर व द. गो. दसनूरकर या साहित्यिक प्रभृतींच्या सहवासाचा परिणामही त्यांच्या जीवनाला कलाटणी देण्याइतपत प्रभावी झाल्याचा प्रत्यय येतो.

अध्यापक झाल्यावर केवळ नोकरीला महत्त्व न देता अध्यापकाची समाजाप्रती असणारी जाण त्यांच्या एकूण कार्यातून व्यक्त होते. श्याम कुरळे हे हाडाचे शिक्षक होते. त्यातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासाला नेहमी चालना देणारे स्तुत्य उपक्रम राबविले. त्यांचे अनेक शिष्यगण त्यामुळे उच्च पदावर सन्मानाने विराजमान झाल्याचे दिसते. शालेय उपक्रमातून अनेक नवनव्या कल्पना अंमलात आणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शाळांना अनुकरण ठरेल अशा मोहिमा आखून त्या त्यांनी यशस्वी केल्या. आकाशवाणी व दूरदर्शनवरून अनेक कार्यक्रम सादर करून समाजप्रबोधन घडविले. त्यांच्या साहित्य परिचयामधून त्यांनी बालकांसाठी निर्माण केलेले विपुल प्रमाणातील बालवाङ्मयाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. त्यांनी कथावाङ्मयाबरोबर कादंबरी, कविता, नाटक, एकांकिका व प्रौढांसाठी उत्कृष्ट लेखन केले आहे. त्यांनी अनेक साहित्य प्रकार हाताळल्याचे त्यांच्या साहित्य परिचयातून दिसते. साहित्यकृतींना लाभलेले मानसन्मान त्यात शिक्षणातील उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रपती पारितोषिक, तर लेखनासाठी राज्यस्तरीय पुरस्कार यांचा समावेश आहे. त्यांच्या एकूण साहित्यकृतींना चाळीसभर मानसन्मान लाभले असून त्यांची ग्रंथसंपदा शंभरच्यावर जाईल इतका त्यांच्या लेखनाचा वेग आहे.

लघुप्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात मराठी कथेच्या परंपरेचा परामर्श घेतला आहे. त्यामध्ये पहिल्यांदा कथेच्या व्याख्या स्पष्ट करून त्यात अव्वल इंग्रजी कालखंडापासून साठोत्तरी कालखंडानंतरची कथा इथपर्यंतच्या कथाकारांच्या कथांचा अभ्यास केला आहे. हरिभाऊंच्या कालखंडापासून सुरू झालेली मराठी कथा दीडशे वर्षात कशी बदलत गेली याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. हरिभाऊंच्या कालखंडातील कथा वास्तववादाकडे झुकलेली दिसते. मात्र पुढे पुढे ती बाह्यअंगाने सशक्त व कलात्मक आणि सकस बनत गेल्याचे दिसते. कलात्मक आणि तांत्रिक बनत गेलेल्या कथांच्या निर्मितीत ना. सी. फडके व वि. स. खांडेकर यांनी तिला विस्तृत करत मार्गस्थ केल्याचे दिसते. त्यात १९४५ पासून हरिभाऊ, वि. सी. गुर्जर, दिवाकर कृष्ण, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, य. गो. जोशी, विभावरी शिरूरकर, र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ इत्यादी कथाकारांनी मराठी कथेला वैभव प्राप्त करून दिले. या कथाकारांची कथा वाचकांच्या चिरकाल स्मरणात राहिली.

सन १९४५ नंतर मराठी कथेने वेगळ्या वळणांनी नवकथेचे दालन समृद्ध केल्याचे दिसते. त्यावेळी ग्रामीण कथा, दलित कथा या प्रवाहांनी वेग धारण केला. गंगाधर गाडगीळांची कथा मानवी मनाच्या तळात जाऊन शोध घेताना दिसते. गाडगीळांच्याबरोबर पु. भा. भावे, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, अण्णाभाऊ साठे अशा दिग्गज कथाकारांनी कथावाङ्मय अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवले. या कथाकारांनी कथावाङ्मयातून मानवी जीवनातील वास्तवता व दाहकता अचूक टिपली आहे.

१९६० नंतरच्या कालखंडातील कथाकारांनी नवे जुने बदल स्वीकारत उत्कृष्टपणे कथेला आपापल्या प्रतिभेने समृद्ध केले आहे. या कालखंडात ग्रामीण व दलित हे दोन प्रवाह वेगाने पुढे आले. या प्रवाहातून चित्रित झालेले जीवन वास्तव व आशयघन होते. त्यामुळे हे दोन प्रमुख प्रवाह पुढे वेगाने मार्गक्रमण करताना दिसतात. या प्रवाहात कथेच्या कक्षा रूंदावल्या व नव्या जाणिवेसह कथावाङ्मय बहरत गेले. याच कालखंडात जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई, बाबूराव बागूल, जयवंत दळवी, द. मा. मिरासदार, शंकर पाटील,

रणजित देसाई, चंद्रकुमार नलगे यांनी मराठी कथावाङ्मयात मोलाची भर टाकत कथावाङ्मय समृद्ध बनविले. पुढे १९८० नंतरच्या कालखंडात भास्कर चंदनशिवे, वामन होवाळ, उत्तम बंडू तुपे, योगीराज वाघमारे व श्याम कुरळे या कथाकारांनी मराठी कथा समृद्ध केली. याच कालखंडात १९७० च्या काळातील ग्रामीण व नागर कथांचे लेखन करणारे व या दोन्ही जीवनातील मानवी जीवनाचे यथार्थपणे चित्रण करणारे लेखक श्याम कुरळे यांच्या कथांचा विचार या प्रकरणात केला आहे.

श्याम कुरळे यांच्या कथांचा परामर्श तिसऱ्या प्रकरणात घेतला असून त्यांच्या कथांच्या परामर्शातून त्यांची लेखनशैली, निवेदनशैली व आशय, जाणिवेसह कथेमधून येणारे बोध व संबोधन यांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे. ग्रामीण व नागर या दोन्ही पार्श्वभूमीवरील लोकजीवन, त्यांच्या समस्या, त्यांच्या अंतर्मनातील असंख्य कंगोरे व आंदोलने अचूक टिपून त्यांच्या कथा बोधपर संदेश देताना दिसतात. या कथांमधून येणाऱ्या व्यक्तिरेखा, त्यांचा स्वभाव, त्यांच्या मनातील चढ-उतार अचूक न्याहाळून त्यांच्या वृत्ती, प्रवृत्ती कथेत साक्षात उभ्या केल्या आहेत. ग्रामीण कथांमधून आलेल्या लोकजीवनातील रूढी, परंपरा, लोकाचार यांचे अस्सल ग्रामीण जीवन त्यांच्या कथांमधून साक्षात उभे राहिल्याचे दिसते. त्यांच्या 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'लास्ट आयटेम' व 'अपूर्ण कथेचा शेवट' या सातही कथासंग्रहामधून १०० च्यावर कथा आलेल्या आहेत. त्यातून प्रकट झालेले विचार हे बदलत्या समाजजीवनातील व्यक्तिरेखांच्या आशय, जाणिवा प्रकट करताना दिसतात.

ग्रामीण जीवनावर परखड भाष्य करणाऱ्या व ग्रामीण जीवनाचा पट साक्षात उभा करणाऱ्या 'इस्कुट' या कथासंग्रहातील कथांमधून आलेल्या आहेत. 'लास्ट आयटेम', 'अपूर्ण कथेचा शेवट' या कथासंग्रहामधून नागर जीवन व मध्यमवर्गीय व गरीब, कामगार जीवन यांचे प्रकट दर्शन घडविणाऱ्या कथा आलेल्या आहेत. 'पायाचा पाषाण', 'पार्टी' या कथासंग्रहामधून येणाऱ्या कथांमधून सामाजिक संदर्भातील वेगवेगळे स्तर व आशय

आलेले दिसतात. शहरीकरणातील वाढत्या समस्या व त्याला जुळवून घेताना मानवाची होणारी घुसमट काही कथांमधून प्रत्ययास येते. 'इरसाल', 'फिरकी' या कथासंग्रहामधून येणाऱ्या कथांमधील विषय व त्याअनुषंगाने येणाऱ्या व्यक्तिरेखा आसू आणि हसू प्रकट करत वास्तवता दर्शवित या कथांमधून मान्वी भावभावना प्रकट करताना दिसतात. ग्रामीण व नागर दोन्ही स्तरावरील व्यक्तिरेखांचे आचारविचार विनोदीशैलीत दाखवत उपहास व उपरोध येऊन या दोन्ही कथासंग्रहामधील कथांना वेगवेगळा आशय प्राप्त झाला आहे. त्यांच्या समकालीन कथाकारात चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, राजन गवस, आप्पासाहेब खोत, नीलम माणगावे, डॉ. पी. जी. कुलकर्णी, रंगराव बापू पाटील यांच्या पाऊल वाटेवरून जाताना श्याम कुरळे यांच्या कथांनी मराठी कथावाङ्मयात मोलाची भर टाकल्याचे दिसते. श्याम कुरळे यांच्या कथांमधून ग्रामीण व नागर जीवन येताना दोन्ही जीवनातील बदलांचा स्वीकार करत व्यक्तिरेखांच्या व्यथा यातना त्यांनी कथेत मांडल्या आहेत. वृद्धांच्या आत्मसन्मानाचा तसेच त्याच्या एकाकीपणातील समस्येचा वेध घेणाऱ्या कथांचेही त्यांनी लेखन केले आहे.

श्याम कुरळे यांच्या कथांची वैशिष्ट्ये व वेगळेपण अभ्यासण्यासाठी चौथ्या प्रकरणात त्यांच्या कथांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या बहुतांश कथा ग्रामीण असल्या तरी मोजक्याच नागरी जीवनाचे चित्रण करणाऱ्याही कथा आहेत. नागरी जीवनातील बदलत्या मानवी मनाची अस्वस्थता, संघर्ष यांचा वेध त्यांनी कथांमधून घेतलेला दिसून येतो. त्यांच्या सर्वच कथांची वैशिष्ट्ये व वेगळेपण आणि त्यात प्रकट झालेल्या आशय-जाणिवा याविषयीचा परामर्श प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे. या सर्व कथांमधून प्रकट होणारे त्यांचे वेगळेपणही या प्रकरणात अभ्यासले आहे. 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल' कथासंग्रहामधून अस्सल ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या बहुतांश कथांमधून आलेल्या व्यक्तिरेखांच्या उपजत नैसर्गिक वर्तनातून काही वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. 'इस्कुट' या अस्सल ग्रामीण कथासंग्रहातील कथांमधून ग्रामीण जीवनाचा पट

साक्षात उभा राहतो. या कथासंग्रहातून येणारे प्रकटन बदलत्या खेड्यातील आशय, जाणिवा स्पष्ट करत मानवी वर्तनातून व स्वभावातून त्याचे दर्शन घडते. ग्रामीण जीवनातील अडीअडचणी त्यांच्यासमोर उभ्या राहिलेल्या समस्या यातून जीवन जगताना आलेले ताणतणावही काही कथांमधून प्रत्ययास येतात. 'इस्कुट' कथासंग्रहातील 'सोयरिक', 'अगतिक', 'आवातनं', 'गावगाऱ्हाणं' या कथांचा आढावा घेतला असता कथेत येणाऱ्या पात्रागणिक त्यांचे दारिद्र्य, वैफल्य, वास्तव जीवन, मानवी मनाची त्रिशंकू अवस्था, वृद्धांच्या व्यथा, यातना व समस्या, दलित-सवर्ण जातीभेद यांचे उत्कृष्ट चित्रण या कथांमधून घडते. राजकीय डावपेचात भरडला जाणारा सामान्य माणूस त्यांच्या क्रिया, प्रतिक्रिया या कथांमधून उलगडत जातात.

'फिरकी' कथासंग्रहातील बहुतांश कथा विनोदी ढंगात लिहिल्यामुळे व्यक्तिरेखांच्या मिस्कील वर्तनाने उत्पन्न झालेला विनोदही काहीतरी प्रेरणा व बोध देताना दिसतो. 'इरसाल' कथासंग्रहातील ग्रामीण व नागर जीवनातील व्यक्तिरेखांनी आपल्या वर्तनातून, सवयीतून, हालचालीतून खळखळणारा विनोद निर्माण केला आहे. पण या विनोदाच्या तळातही काहीतरी सल लपल्याचा होणारा भास काही कथांमधून प्रत्ययास येतो.

ग्रामीण जीवनातील स्त्रीजीवनाचे वेधक चित्रण 'ओझे', 'इगत', 'अगतिक', 'गावगाऱ्हाणं', 'शापित सौंदर्य' यासारख्या कथांमधून घडत जाते. ग्रामीण जीवनात रूढी, परंपरेत येणाऱ्या श्रद्धा व अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकणाऱ्या 'करणी', 'रामाच्या पादुका', 'देवीची साडी' या कथांमधून श्रद्धा व अंधश्रद्धा यावर परखड भाष्य करणाऱ्या कथांनी समाजप्रबोधन घडविले आहे.

वृद्धत्वविषयक येणाऱ्या आशय, जाणिवेतून वृद्धांच्या व्यथा, यातना व समस्येवर विचार करावयास लावणाऱ्या 'वाटणी', 'परतीचा प्रवास', 'पायाचा पाषाण', 'गंजलेली तिजोरी' या कथांमधून वृद्ध व्यक्तीच्या आत्मक्लेषाची जाणीव सर्व कथेभर होताना दिसते.

'लास्ट आयटेम' व 'अपूर्ण कथेचा शेवट' या कथासंग्रहातून येणारे मानवी जीवन, त्यांच्या भावभावना, कथेत येणाऱ्या व्यक्तिरेखा, त्यांच्या अंतर्मनाचा घेतलेला वेध या कथासंग्रहातील कथांमधून त्यांचे होणारे प्रकट दर्शन, त्यांची वैशिष्ट्ये व ग्रामीण व नागर जीवनात व्यक्तिरेखा प्रवेशताना त्या अनुषंगाने कथेत आलेले वेगळेपण याचा अभ्यास केला आहे.

'लास्ट आयटेम' या शीर्षक कथेतील फोफावलेल्या भ्रष्टाचाराचे घडलेले विकृत रूप, 'दंगल' कथेत येणाऱ्या व्यक्तिरेखांनी समाजविघातक शक्तींनी हादरलेले शहर, व्यापार, उदीम यावर झालेले घातक परिणाम यावर प्रकाश टाकत श्याम कुरळे यांनी महानगरीय जीवनातील वास्तव प्रकट केले आहे.

'बकासूर' यासारख्या कथांमधून बदलते नागरी जीवन, कामगार जीवन, व्यक्तिरेखांच्या अंतर्मनातील हूरहूर, आत्मक्लेश याची जाण या कथेत येते. 'शापित सौंदर्य', 'मी काय करू', 'सूड' यासारख्या कथांमधून बदलत जाणारी स्त्री, तिची शोषिकता व विद्रोह या कथांतून स्पष्ट होत जातो.

एकंदरीत श्याम कुरळे यांच्या सातही कथासंग्रहातील कथांमधून ग्रामीण व नागर जीवनातील वास्तवता स्पष्ट झाली असून ग्रामीण जीवनातील असंख्य अडीअडचणी व समस्या यांचा वेध घेतला आहे. नागर जीवनातील मध्यमवर्गीय जीवन, औद्योगिक क्रांतीतील महत्त्वाकांक्षी राक्षसीवृत्ती, मजूरवर्गाची परवड, लोकसंख्या, खेड्यातून शहरात पोटापाण्यासाठी आलेल्या व्यक्तिरेखांना नागर जीवनाशी जुळवून घेताना त्यांची होणारी घुसमट प्रकट करणाऱ्या कथांमधून नागर जीवन वास्तव समोर येते. नागर जीवनात घडत जाणारे बदल, औद्योगिक क्रांतीच्या पडद्याआड लपलेली लबाडी यातून कोसळलेली मानवी मूल्ये स्पष्ट करणाऱ्या काही कथांमधून नागरी जीवनाचे दर्शन घडते.

लघुप्रबंधाच्या पाचव्या प्रकरणात श्याम कुरळे यांच्या कथांचे वाङ्मयीन परीक्षण केले आहे. त्यामध्ये त्यांच्या कथांची कथानके, कथेतील व्यक्तिचित्रण, प्रसंगनिर्मिती, वातावरण निर्मिती, कथेत येणाऱ्या आशय जाणिवा, त्यांची निवेदनशैली, संवादशैली यांचा प्रस्तुत प्रकरणात अभ्यास केला आहे.

श्याम कुरळे यांच्या कथेतील कथानक हे समाजात घडणाऱ्या विविध घटना, प्रसंगातून आले आहे. त्यांच्या कथांच्या कथानकातून कोणता ना कोणतातरी शोध व बोध व संबोधन येताना दिसते. काही कथा सत्यघटना, प्रसंगातून निर्माण झालेल्या आहेत. या कथानकातून सत्य, असत्य व वास्तवाचे प्रत्ययकारी दर्शन घडते.

श्याम कुरळे यांच्या कथेत व्यक्तिचित्रण हा कथेच्या घटकामध्ये एक प्रमुख आणि अपरिहार्य घटक आहे. त्यांनी आपल्या 'फिरकी', 'इस्कुट', 'पायाचा पाषाण', 'इरसाल', 'पार्टी', 'लास्ट आयटेम' व 'अपूर्ण कथेचा शेवट' या सात कथासंग्रहामधून व्यक्तिरेखांच्या अंतर्मनातील आर्त तळमळ तन्मयतेने मांडली आहे. त्यांनी व्यक्तिचित्रणातून ग्रामीण व नागर जीवनातील येणाऱ्या व्यक्तिरेखांचे भावबंध उत्कृष्टपणे उलगडून दाखविले आहेत.

पात्र-प्रसंगाचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण करणारी त्यांची सहजसुंदर वर्णनशैली हा त्यांच्या कथेत येणारा विशेष कथांमधून जाणवत राहतो. श्याम कुरळे यांनी प्रसंगनिर्मितीतून ग्रामीण व नागर जीवनातील मानवी सुखदुःख, व्यथा-वेदना यांचे वास्तव चित्रण आपल्या कथांमधून केले आहे. प्रसंगनिर्मिती करत असताना उत्कृष्टप्रकारे वातावरण निर्मिती केल्यामुळे कथेचा पट साक्षात उभा राहतो आणि कथेचे सौंदर्य आणखी वृद्धींगत होते. त्यांच्या बहुतांश कथांची सुरूवात घटना, प्रसंगाना साजेशे ठरेल अशा वातावरणनिर्मितीने झालेली दिसते. श्याम कुरळे यांनी उत्कृष्टपणे प्रसंगनिर्मिती व वातावरण निर्मिती केल्यामुळे त्यांच्या कथांना वेगळेच सौंदर्य लाभले आहे.

कथेतील प्रसंग, वातावरणाबरोबर कथेत येणाऱ्या आशय जाणिवेला अधिक प्राधान्य दिल्याचा वाचकाना प्रत्यय येतो. त्यांच्या कथांमधून येणारे आशय हे वेगवेगळ्या स्वरूपात विशद होताना दिसतात. ग्रामीण आणि नागर जीवनातील वास्तव प्रकट करताना आलेले आशय हे मानवी जीवनातील गुंतागुंत व त्यांच्या मनातील वेगवेगळ्या प्रतिक्रिया, अनेक भेडसावणारे प्रश्न, त्यांची तगमग, मनातील साचलेपण, नागर जीवनातील राहणीमान, औद्योगिकरणातून निर्माण झालेल्या समस्या या आशय जाणिवेतून स्वातंत्र्य विषयक, आरोग्य विषयक, समाज विषयक, धर्म विषयक, वृद्धत्व विषयक अशा अनेक जाणिवा त्यांच्या कथेत व्यक्त होताना दिसतात.

प्रस्तुत प्रकरणात श्याम कुरळे यांच्या कथेच्या भाषिक वैशिष्ट्यांचाही आढावा घेतला आहे. त्यामध्ये भाषाशैली, निवेदन पद्धती, संवादलेखन आणि पत्रात्मक मनोगतातून लेखनतंत्राचा केलेला विचार या प्रकरणात केला आहे.

त्यांच्या कथेत येणाऱ्या इतर घटकाप्रमाणेच त्यांच्या कथेतील भाषिक घटक हे प्रासादिक लयीतून अवतरलेले दिसतात. कथेच्या भाषाशैलीमध्ये ग्रामीण व नागर भाषा, इंग्रजी, हिंदी शब्दांचा व वाक्यांचा केलेला वापर काही कथांमधून दिसून येतो. तसेच कथेत येणारे संवाद हे व्यक्तिगणिक त्यांच्या उपजत नैसर्गिक वृत्ती, प्रवृत्ती व व्यवसाय, ग्रामीण व नागर पार्श्वभूमीला चपखल बसतील असे आल्यामुळे त्यांच्या कथातील व्यक्तिरेखा जिवंत वाटतात. त्याचबरोबर त्यांनी भाषिक रचनेत पत्रात्मक, मनोगत इत्यादी तंत्रे वापरून मानवी भावभावनांचे वेगवेगळे पदर कथेत दर्शविले आहेत. यातून त्यांचे भाषेचे प्रयोगनिष्ठ तंत्र अनुभवास येते. बहुतांश कथांमधून त्यांची भाषाशैली बोलीतून येताना ती अधिकच सजीव होत जाते. त्यातून व्यक्तिरेखांच्या जीवनात डोकावणाऱ्या व जीवन जगताना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टा कथेतून स्पष्ट होतात. ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना रूढी, परंपरेतून आलेले जीवन व त्यातून निर्माण झालेल्या श्रद्धा व अंधश्रद्धा जोपासताना बदलत चाललेल्या ग्रामसंस्कृतीचेही दर्शन काही कथांमधून होते. ग्रामीण पार्श्वभूमीवर

वृद्धांच्या व्यथा, यातना प्रकट होत त्यांच्या आत्मक्लेषातून निर्माण होणारे अनेक प्रश्न काही कथांनी उपस्थित केले आहेत. राजकारण, समाजकारण, जातीभेद यातून निर्माण झालेले ताणतणावांचे चित्रण यांचाही या प्रकरणात विचार केला आहे.

अशा अनेक वैशिष्ट्यांतून श्याम कुरळे यांचे वेगळेपण सातत्याने जाणवत राहते. बदलांच्या खुणा व जाणिवा दर्शवून त्यांची कथा आपले वेगळेपण जोपासताना दिसते. त्यामुळे या सातही कथासंग्रहांना वाचकांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे.

आजही त्यांचे लेखन विविध नियतकालिकातून प्रसिद्ध होताना दिसते. वेगवेगळ्या साहित्यिक कार्यक्रमातील उपस्थिती, उदयोन्मुख कवी, लेखकांना ते आजही मोलाचे मार्गदर्शन करताना दिसतात. पुढेही त्यांच्या लेखणीतून सकस आणि कसदार साहित्य निर्माण होईल अशी अपेक्षा करणे सार्थ व सयुक्तिक ठरेल.